**ठळक बातम्या**

- आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीचं सरकार राज्यात सत्तेत येईल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून व्यक्त
- मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या रकमेतून शुल्क कापणाऱ्या बँकांवर कारवाई करण्याचा महिला आणि बालविकास मंत्र्यांचा इशारा
- एसटी महामंडळाच्या ३४३ बस स्थानकांवर 'आनंद आरोग्य केंद्र' हे दवाखाने सुरू होणार
- बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातल्या संस्थेच्या विश्वस्तांना अटक न केल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाकडून नाराजी व्यक्त

**आणि**

- राज्यात यंदाच्या हंगामात सरासरीच्या तुलनेत १२६ टक्के पाऊस

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीचं सरकार राज्यात सत्तेत येईल असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज व्यक्त केला. मुंबईत भाजपा कार्यकर्त्यांना त्यांनी संबोधित केलं. कुठल्याही सर्व्हेचा विचार करू नका, महायुती पुन्हा सत्तेत येईल ही काळ्या दगडावरची रेष असल्याचं त्यांनी यावेळी कार्यकर्त्यांना सांगितलं.

प्रदेश भाजपा निवडणुकीसाठी जी योजना बनवेल ती योग्यरितीनं कार्यान्वित करण्याचं आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केलं. मतदानाचं प्रमाण १० टक्क्यांनी वाढवण्याचं आवाहनही त्यांनी केलं. संध्याकाळी त्यांनी नवीमुंबईत वाशीमध्ये कार्यकर्त्यांच्या संवाद बैठकीत मार्गदर्शन केलं. या वेळी त्यांनी कोकण आणि ठाण्यातल्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला.

**<><><><><>**

टेंभू विस्तारीत प्रकल्पातल्या, सांगली जिल्ह्यातल्या तीन घटक कामांचं भूमीपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज झालं. या घटक कामांमध्ये टेंभू विस्तारीत प्रकल्पातल्या टप्पा क्रमांक ६, पळशी उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक ५ वितरण व्यवस्था, आणि कामथ गुरूत्व नलिका, यांचा समावेश आहे.

या कामांच्या भूमिपूजनातून काळ्या आईचं पांग फेडण्याचा प्रयत्न केला असल्याची भावना मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.

**होल्ड - बाईट -मुख्यमंत्री (१२ सेकंद)**

या योजनेच्या सहाव्या टप्प्याला दिवंगत आमदार अनिल बाबर यांचं नाव देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. त्यानंतर विटा इथं आयोजित शेतकरी मेळाव्यात त्यांनी, टेंभू योजनापूर्तीसाठी दिवंगत बाबर यांचं मोलाचं योगदान असल्याचं सांगितलं. कार्यक्रमाला उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई, सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे आदि उपस्थित होते.

**<><><><><>**

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या जमा झालेल्या रकमेतून मिनिमम बॅलन्स, ईसीएस मँडेट रिटर्न, चेक रिटर्न इत्यादीसाठीचं शुल्क कापणाऱ्या बँकांवर कारवाई केली जाईल, असं महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आज सांगितलं. त्या आज मंत्रालयात या योजनेसंदर्भात आयोजित राज्यस्तरीय आढावा बैठकीत बोलत होत्या. बँकेशी संबंधित अडचणी संदर्भात स्थानिक पातळीवर बैठका घ्याव्यात, अशा सूचना आदिती तटकरे यांनी अधिकाऱ्यांना यावेळी दिल्या.

**<><><><><>**

राज्यातल्या एकूण आठ वैद्यकीय महाविद्यालयांना अटी आणि शर्तींच्या अधीन राहून राष्ट्रीय आरोग्य विज्ञान विभागानं मान्यता दिली असून, याच सत्रापासून ही आठही महाविद्यालयं सुरू होणार आहेत. केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज बुलढाणा इथं वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

या आठ वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रत्येकी १०० याप्रमाणे ८०० वैद्यकीय प्रवेशांमुळे देशातली एकूण प्रवेश संख्या एक लाख १६ हजार ६१२ एवढी होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. गेल्या दहा वर्षात वैद्यकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल झाला असल्याचं ते म्हणाले. ॲलोपॅथी औषधी उपचार पद्धतीप्रमाणे आयुर्वेदात रिफंड योजना लागू केली जाणार आहे. त्यासाठी १७० औषधांच्या पॅकेजवर सध्या काम सुरू असून लवकरच ही योजना लागू होईल, असं प्रतापराव जाधव यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात सर्वसमावेशक पीक योजनेअंतर्गत गेल्या वर्षी खरीप हंगामात झालेल्या अधिकच्या नुकसान भरपाई पोटी पीक विम्याची रक्कम ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीला वर्ग करण्यासाठी राज्य शासनानं मान्यता दिली आहे. त्यामुळे ६ जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांना १ हजार ९२७ कोटी रुपये लवकरच वितरीत होतील, अशी माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली

**<><><><>**

एसटी महामंडळाच्या ३४३ बस स्थानकांवर ‘आनंद आरोग्य केंद्र’ हे दवाखाने सुरू होणार आहेत. याठिकाणी सर्व नागरिकांना डॉक्टरांच्या सल्ल्यासह कमी दरात विविध चाचण्या आणि औषधं मिळणार आहेत. महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत हा निर्णय झाला.

प्रत्येक स्थानकावर महिला बचत गटांना नाममात्र दरात भाडे तत्त्वावर स्टॉल दिले जाणार आहेत. नवीन अडीच हजार बसची खरेदी, १०० डिझेल बसचे इलेक्ट्रिक बसमध्ये रुपांतर होणार आहे. मुंबई-पुणे मार्गावरच्या ईलेक्ट्रिक शिवनेरीमध्ये प्रवाशांच्या मदतीसाठी हवाई सुंदरींच्या धर्तीवर शिवनेरी सुंदरी नेमण्याचा निर्णयही महामंडळानं घेतला आहे.

**<><><><>**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातल्या दोन आरोपींना पोलिसांनी अद्याप पकडलं नसल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे. या प्रकरणी स्वतःहून दखल घेऊन चालवलेल्या सुनावणी दरम्यान न्यायमूर्ती रेवती मोहिते- डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांनी पोलिसांच्या निष्क्रीयतेवर ताशेरे ओढले. या प्रकरणातले दोन आरोपी संबंधित शाळेचे विश्वस्त असून ते अद्याप फरार आहेत.

या आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर होण्याची वाट पहात आहात का असा सवाल खंडपीठानं पोलिसांना केला. विशेष तपास पथकाचे प्रमुख सुनावणीला हजर नसल्याबद्दलही न्यायालयानं नाराजी व्यक्त केली. पुढची सुनावणी येत्या २३ ऑक्टोबरला ठेवली आहे.

**<><><><><>**

यंदाच्या हंगामात राज्यात १२६ टक्के पाऊस पडला. सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडेल हा हवामान विभागाचा अंदाज खरा ठरल्याची माहिती हवामान विभागाचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी दिली आहे. हिंगोली आणि अमरावती वगळता राज्यातल्या सर्व जिल्ह्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला. अहमदनगरमध्ये ४९ टक्के तर सांगलीत ४८ टक्के अधिक पावसाची नोंद झाली. जळगाव, नाशिक, कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये सरासरीच्या तुलनेत ४० टक्के पेक्षा जास्त पाऊस झाला. हिंगोलीमध्ये सरासरीपेक्षा ३५ टक्के कमी तर अमरावतीमध्ये २ टक्के कमी पाऊस झाला.

यंदाच्या पावसाळ्यात सरासरीपेक्षा सुमारे २५८ मिलीमीटर अधिक पावसाची नोंद झाली आहे. दरवर्षी जून ते सप्टेंबर या कालावधीत राज्यात सरासरी ९९४ मिलीमीटर पाऊस पडतो. मात्र यंदा या कालावधीत १ हजार २५८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली.

**<><><><><>**

‘स्वच्छता ही सेवा’ अभियान सध्या देशभरात राबवलं जात आहे.  चंद्रपूर जिल्ह्यात हे अभियान राबवण्यात आलं. याबाबत स्वच्छता मित्र स्वप्निल अक्केवार यांनी आकाशवाणीला सांगितलं....

**होल्ड बाईट - स्वप्निल अक्केवार (२१ सेकंद)**

**<><><><><>**

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज मुंबईत वाडीबंदर कोचिंग डेपोची पाहणी केली. पायाभूत सुविधा, तांत्रिक प्रगती आणि डेपोच्या भविष्यातल्या विस्तार योजनांचा आढावा त्यांनी यावेळी घेतला. बेस्ट फ्रॉम वेस्ट या प्रदर्शनात त्यांनी कचरा संकलन विषयीच्या नव्या कल्पनांचं त्यांनी कौतुकही केलं. वंदे भारत या रेल्वेगाडीसाठी आवश्यक सुट्या भागांची साठवण असलेल्या वंदे भारत स्टोअरलाही यावेळी रेल्वे मंत्र्यांनी भेट दिली.

**<><><><><>**

मुंबईतल्या नायर रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांची बदली करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. लैंगिक छळ प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी विशेष समिती नेमण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. तसंच रुग्णालयातले कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी अतिरिक्त उपाय योजना करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण इथल्या छत्रपती शिवाजी महाराज पुतळा दुर्घटना प्रकरणी जयदीप आपटेचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला. सध्या तो न्यायालयीन कोठडीत आहे. पुतळा उभारताना योग्य काळजी घेतली नाही. पुतळ्याच्या उभारणीतलं साहित्य निकृष्ट दर्जाचं होतं, असा सरकारी वकिलांचा युक्तीवाद जामीन फेटाळताना न्यायालयानं मान्य केला.

**<><><><><>**

बांगलादेशाविरुद्धच्या मालिकेतला दुसरा आणि अंतिम सामना आज भारतानं जिंकला. दुसऱ्या डावात बांग्लादेशाकडून मिळालेलं ९५ धावांचं आव्हान भारतानं ३

गड्यांच्या मोबदल्यात पार केलं. भारतानं ही मालिका २-० अशी जिंकली. यशस्वी जयस्वाल सामनावीर तर आर. अश्विन मालिकावीर ठरला.

पाचव्या दिवशी बांगलादेशाचा दुसरा डाव १४६ धावांवर आटोपला. जसप्रित बुमराह, आर. अश्विन आणि रविंद्र जडेजा यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले. यशस्वी जयस्वालच्या ५१ आणि विराट कोहलीच्या नाबाद २९ धावांच्या बळावर भारतानं हा सामना जिंकला.

**<><><><><>**

महाविकास आघाडीचं जागावाटप दसऱ्याला जाहीर होणार आहे. आतापर्यंत २०० पेक्षा अधिक जागांवर एकमत झाल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी दिली. आता डावे पक्ष आणि इतर संघटनांसोबत चर्चा सुरू असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

पुढच्या पाच दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रातल्या काही भागात विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना होण्याची शक्यता असल्याचंही हवामान विभागानं कळवलं आहे.